MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2020
Issue-33, Vol-06

Date of Publication
01 Feb. 2020

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

13) An Overview of GST And its Impact On Economic Development Of India
Dr. ANIL PRASAD YADAV, RANCHI, JHARKHAND ||65

14) Report on Teenage Cell Phone and Internet Addiction
DR. H. D. GOPAL, RAMANAGARA (DIST) ||70

15) शाश्वत विकास आणि हवामान बदल
प्रा.डॉ. शिंदे केशव दत्तराव, जि. बीड ||74

16) भारतीय राज्यघटना आणि महिलांचे स्थान
डॉ. ज्ञानेश्वर शामराव आवाळे, पुणे ||76

17) सार्वजनिक आरोग्याचे अर्थशास्त्र
Prof. Dr. Priti I. Bande, Gondia ||78

18) महात्मा गांधी ग्रामविकास विषयक व आर्थिक विचारासंबंधी विचार
प्रा.डॉ. सुषमा सतिश देशपांडे, औरंगाबाद ||83

19) मराठी इतिहासातील शोषित जमात
प्रा.डॉ. घोलप कमलाकर गोरख, जि. उस्मानाबाद ||85

20) विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.) आणि उच्च शैक्षणिक विकास (संदर्भ - 2002-2012)
प्रा.डॉ. विजयसिंग आर. गिरासे, नंदुरबार ||89

21) कृष्णाचे अस्तित्व व भविष्यातील परिस्थिती
प्रा. मिलींद रामदास जांभुळकर, चंद्रपूर ||94

22) आधुनिक शिक्षणातील विचारप्रवाह
प्रा.डॉ. आर. डी. खताळ, गेवराई ||99

23) तुकारामांची अभंग गाथा : काही समस्या
डॉ. मधु हरिश्चंद्र खोडे, वर्धा ||102

24) त्रिस्थळपुराणाची भाषा
प्रा.डॉ. बाळकृष्ण रामचंद्र लळीत, जि. पुणे ||107

25) राजर्षी शाहू नागरी सहकारी पत संस्था मर्यादित मुरगूड या संस्थेचा ग्रामीण आर्थिक ...
डॉ. श्री. अमृता गणपती मगदूम, जि. कोल्हापूर ||113

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

22

# आधुनिक शिक्षणातील विचारप्रवाह

प्रा.डॉ. आर. डी. खताळ
समाजशास्त्र विभागप्रमुख,
महिला महाविद्यालय गेवराई

***********

प्रास्ताविक-

आधुनिक काळात भारताबरोबरच जगात विविध समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.यात प्रमुख म्हणजे वाढती लोकसंख्या होय. याशिवाय पर्यावरण असंतुलन म्हणजेच प्रदुषण होय.प्रदुषणाच्या समस्येने व्यापक रुप धारण केलेले दिसून येते. तसेच बेरोजगारी, यातून जनारोग्य, गुन्हेगारी, मानसिक, ताणतणाव, मानसिक संघर्ष, वैफल्य इ.समस्या सोडविण्यासाठी आधुनिक काळात शिक्षणात काही आधुनिक विचार,नव्या पध्दती व नविन अभ्यासक्रम सुरु करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. विशेषत: विद्यार्थ्यांसमोर लोकसंख्या वाढीचे स्वरुप ठेवणे त्याचे दुष्परिणाम त्यांना सांगणे काळाची गरज बनली आहे.यामुळे विद्यार्थी आपल्या जीवनात यासंबंधी उपाययोजना करतील.लोकसंख्या वाढीबराबरच पर्यावरण प्रदुषणाच्या,हवा,पाणी,अन्न ध्वनीच्या प्रदुषणामुळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. आपल्या सभोवतीच्या नैसर्गिक साधन संपत्तीचा काटकसरीने उपयोग करुन पर्यावरणाचा समतोल साधला नाही तर मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल्या शिवाय राहणार नाही.याची जाणीव विद्यार्थ्यांना होण्यासाठी आधुनिक शिक्षणात नवे आणि आधुनिक विचार प्रवाह निर्माण होणे काळाची गरज आहे. आरोग्य शिक्षणात शारिरिक आणि मानसिक ताणतणाव बाबतचे शिक्षण मिळणे अपेक्षीत आहे. अशा प्रकारचे नविन आणि आजच्या समस्यांबाबतचे नविन विचारप्रवाह विद्यार्थ्यांसमोर मांडणे क्रमप्राप्त बनले आहे. यातून या विविध समस्यांवर उपाययोजना शोधणे सोपे होईल, पर्यायाने समस्यांची, प्रश्नांची तिव्रता कमी होऊन मानवी जीवन सुसह्य होईल.

आधुनिक शिक्षणात मानवी जीवनाच्या आवश्यकतेनुसार विविध नविन विचारप्रवाह येताना दिसतात. पारंपारिक शिक्षण पध्दतीपेक्षा जास्त नविन शिक्षण पध्दती येताना दिसते. विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी किंवा समस्यांची तिव्रता कमी करण्यासाठी आधुनिक शिक्षण पध्दतीत बदल करुन त्यात काही आधुनिक विचार, नविन प्रथा, नवे प्रवाह स्विकारणे क्रमप्राप्त ठरते. याशिवाय नव्या समाजाची निर्मिती अशक्यप्राय होईल. यामुळेच लोकशाहीनिष्ठ, पुरोगामी व विज्ञाननिष्ठ समाज घडविला जाणार आहे. म्हणून आधुनिक शिक्षणात नविन विचारप्रवाह येताना दिसतात.

**शोध निबंधाची उद्दिष्टे-** 'शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह या'शोध निबंधाच्या अनुषंगाने निर्धारित केलेली उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाहाचा अभ्यास करणे

२) शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाहातील विविध घटकांचे महत्व अभ्यासणे

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत शोध निबंधासाठी सामाजिक संशोधनातील दुय्यम तथ्यसंकलन पध्दतीचा अवलंब केलेला असुन यासाठी विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. यावरुन प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह ही अलिकडच्या काळातील संकल्पना असून याचे स्वरुप अधिकाधिक व्यापक आणि विस्तृत होताना दिसत आहे. शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह हे प्राथमिक शिक्षणापासुन ते विद्यापीठीय शिक्षणातील महत्वाचा अभ्यासविषय बनलेला दिसुन येतो. त्यामुळे अशा विचारप्रवाहाचा संबंध सर्व स्तरावरील बालकांच्या व्यक्तीगत विकासाबरोबरच त्यांच्या जीवनाच्या सर्वांगिण विकासाचा मार्गही सुकर होत आहे. यातून बालकांच्या सर्वांगिण विकासाचे स्वप्न साकार होउ शकते. म्हणूनच शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह महत्वाचे मानले जातात.

**आधुनिक विचार-**शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह खालीलप्रमाणे.

**१. पर्यावरण शिक्षण-**

मानवाचा सभोवतीच्या पर्यावरणातील काही घटक मानवाला उपयोगी असतात तर काही हानीकारक मानवाला अनुकूल घटकांमुळे प्रगती होते तर प्रतिकूल घटकांमुळे प्रगतीला अडथळा येतो. यातूनच पर्यावरण शिक्षणाची ही संकल्पना अत्यंत गुंतागुंतीची बनली आहे. पर्यावरण शिक्षण समाजातील लोकांमध्ये

२) लोकसंख्या शिक्षण (Population education)

३) आरोग्य शिक्षण (Health education)

पर्यावरणविषयक जाणीव जागृती करणे. पर्यावरण शिक्षणात नैसर्गिक पर्यावरण आणि मानवनिर्मित पर्यावरणातील परस्परसंबंध व भविष्यातील परिणामाची कल्पना देण्यासाठी जाणीव जागृती करणे.

पर्यावरण शिक्षणात मानवाचे पर्यावरणाशी असणारे नाते महत्वाचे असून मानव पर्यावरणावर अवलंबून आहे हे समजण्यासाठी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जाणीव - जागृती करणारे शिक्षण आहे. मानवाचे पृथ्वीवरील अस्तित्व कायम ठेवून त्याचे भविष्य घडविण्यासाठी त्यासाठी मानव व पर्यावरण यांच्यातील संबंध लक्षात घेवून पर्यावरणातील घटकांची योग्य ती काळजी घेण्यास महत्व आहे. त्यासाठी जाणीव जागृती करणे व आवश्यक असणारी कौशल्य विकसित करणे याला पर्यावरण शिक्षणात महत्व आहे. त्यासाठी आवश्यक कौशल्य समाजात विकसित करण्यावर भर दिला जातो. पर्यावरण शिक्षणात प्राथमिक स्तरापासुन विद्यापिठीय स्तरावरील शिक्षणात विद्यार्थ्यांना जागृत करणे.त्यांना पर्यावरण संतुलनाचे महत्व सांगणे, प्रदुषणाच्या गंभीर परिणामांची जाणीव करुन देणे आणि त्यांना कृतिशिल बनवणे याला पर्यावरण शिक्षणात महत्व असते.

२) लोकसंख्या शिक्षण (Population education)

लोकसंख्या शिक्षण म्हणजे लोकसंख्येचे शिक्षण नसुन ते लोकसंख्येविषयीचे शिक्षण होय. लोकसंख्याशिक्षण ही एक शैक्षणिक प्रक्रिया असुन यात जननक्षमता, नैतिकता आणि स्थलांतरा विषयी शिक्षण देण्यावर अधिक भर दिला जातो. लोकसंख्या शिक्षणाद्वारे लोकांना लोकसंख्या वाढीचे स्वरुप, कारणे आणि परिणाम याविषयीची माहिती देण्यात येते. व्यक्ती आणि समाजाचा घटक म्हणून कुटुंब, निर्णय घेणारे जबाबदार घटक म्हणून, समूहात नागरिक म्हणून, समाजात नेते म्हणून लोकसंख्या शिक्षण उपयोगी ठरते .लोकसंख्या शिक्षणाचा आशय व्यक्ती, समूह, राष्ट्र आणि विश्व यांच्या समस्यांशी निगडीत आहे. म्हणून ते निश्चितपणे त्यासाठी जाणीव जागृती करणे व आवश्यक असणारी कौशल्य विकसित करणे याला पर्यावरण शिक्षणात महत्व आहे. त्यासाठी आवश्यक कौशल्य समाजात विकसित करण्यावर भर दिला जातो.

लोकसंख्या शिक्षणाची व्याप्ती मोठी असून यात व्यक्ती, समूह, समाज,राष्ट्र आणि विश्वाचा समावेश होतो. त्याचप्रमाणे औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाशी लोकसंख्या शिक्षणाचा जवळचा संबंध आहे. शालेय शिक्षणापासून ते विद्यापिठीय शिक्षणापर्यंत लोकसंख्या शिक्षण सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना दिले जाते. शालेय आणि उच्च शिक्षणातील विविध विषयांच्या मानवशास्त्र म्हणजे विज्ञान आणि भूगोल, भूगर्भशास्त्र, पर्यावरण शास्त्र, कृषीशास्त्र अशा विविध विषयांच्या अभ्यासक्रमातून ते विद्यापीठापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न होताना दिसतो. लोकसंख्या शिक्षणामुळे सामाजिक समस्यांची जाणीव, नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर योग्यरितीने करण्याची मानसिकता तयार होते. राष्ट्रीय व सामाजिक जबाबदारीची जाणीव होते. निर्णयक्षमता निर्माण होते. विद्यार्थी विज्ञाननिष्ठ, राष्ट्रनिष्ठ व विवेकनिष्ठ बनतात, म्हणून लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज बनलेली आहे.

३) आरोग्य शिक्षण-(Health education)

शारिरिक मानसिक आणि सामाजिक सुस्थिती म्हणजेच आरोग्य होय. यावरुन आरोग्यात शरीरा इतकेच मनालाही महत्व असते. मनावरील ताण - तणाव, चिंता, मानसिक संघर्ष आणि नैराश्य, मनाचे आरोग्य नष्ट करण्यास कारणीभूत ठरतात. म्हणून शरिराच्या आरोग्यासाठी मानसिक आरोग्य आवश्यक आहे. व्यक्तीच्या आरोग्यात शरीर, मन या बरोबरच समाज हा घटकही महत्त्वाचा ठरतो. समाजाचा एक घटक म्हणून व्यक्तीला समाजाने निर्धारित केलेले सामाजिक संकेत, धार्मिक मूल्ये आणि आदर्श रुढी, परंपरा, कायदे यांचे पालन करावे लागते. सामाजिक आंतरक्रियाद्वारे समाजात दोन व्यक्तीमध्ये मैत्री, सहकार्य, त्याग, सेवा या गुणांचा विकास होतो. आरोग्याबाबत वरील घटक महत्त्वाचे ठरतात.

व्यक्तीच्या सर्वांगिण विकासात शिक्षणाचा मोलाचा वाटा असतो. व्यक्तींच्या सर्वांगिण विकासात त्याचा बौध्दीक, भावनिक, सामाजिक, शारिरीक आणि नैतिक विकासाचा अंतर्भाव होतो. अशाप्रकारचा विकास होत असतांना शारिरीक, मानसिक व सामाजिक विकास साधन्यासाठी आरोग्याला महत्त्व असते. यामुळेच आरोग्या बाबतच्या शिक्षणाला महत्त्व प्राप्त होते. मानवी आरोग्य रक्षणासाठी दिल्या जाणा-या शिक्षणाला आरोग्य शिक्षण म्हटले जाते. शैक्षणिक आणि सामाजिक संस्थामधून, आरोग्य शिक्षण ही संकल्पना सर्वमान्य झालेली दिसून येते. आधुनिक काळातील गतिमान मानवी जीवनामुळे सतत ताणतणाव, नैराश्य, संघर्ष, वैफल्य आणि चिंता इ. वाढत्या प्रभावामुळे मानवी आरोग्य धोक्यात येताना दिसते. याशिवाय वातावरणातील वाढते प्रदुषण असंतुलित व निकृष्ट आहार, व्यसनाचे वाढते प्रमाण, स्वैराचारी जीवनप्रणाली आणि व्यायामाचा अभाव यांमुळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. चंगळवादी संस्कृती, फॅशनचे वाढते प्रमाण, मानवी आरोग्य बिघडवताना दिसते. यामुळे आरोग्य शिक्षणही काळाची गरज ठरली आहे.

आरोग्य शिक्षण ही संकल्पना प्रथमत: अमेरिकेत प्रचलित झाली. अमेरिकन बाल आरोग्य मंडळाचे इ.स.१९१८ मध्ये शालेय शिक्षणात आरोग्य शिक्षण हा शब्दप्रयोग वापरला. आरोग्य शिक्षणात बालकांचा शारिरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्याचा समावेश करण्यात आला आणि नंतरच्या काळात आरोग्य शिक्षणाचा जगात प्रचार आणि प्रसार झालेला दिसून येतो. आधुनिक काळात शालेय स्तरापासून ते विद्यापिठीय स्तरावर आरोग्य शिक्षण ही संकल्पना अधिकाधिक रुजविण्याचा सतत प्रयत्न होताना दिसतो. यासाठी योग, प्राणायाम, ताण-तणावाचे व्यवस्थापन करण्यावर अधिकाधिक भर दिला जातो.

१) योग- (Yoga)

मानवी जीवनाशी संबधीत असणारे शास्त्र म्हणजे योग होय. पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र किंवा इतर नैसर्गिक शास्त्रे सत्य शोधण्याचा प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे योगशास्त्र हे मानवी जीवनातील चेतनाशक्तीचे स्वरुप शोधण्याचे कार्य करते. भौतिकशास्त्रामुळे मानव व्यक्तीगत जीवनात सुखी, समाधानी व आध्यात्मिक कृतार्थ होईल असे नाही. पण योगशास्त्रामुळे मानव व्यक्तीगत जीवनात सुखी, समाधानी आणि अध्यात्मिकदृष्ट्या कृतार्थ होतो. म्हणून योगशास्त्र हे भौतिक व अध्यात्मिक असा समतोल विकास साधणारे शास्त्र आहे. योग हा शब्द 'युज' धातुपासून तयार झालेला आहे. त्याचा अर्थ जोडणे, संतुलन निर्माण करणे असा आहे. शरिरातील इंद्रिये, मन, आत्मा, यांच्यामध्ये संतुलन निर्माण करणे किंवा योग्य तऱ्हेने जोडणे असा अर्थ आहे. योगशास्त्राला तत्वज्ञानाचे आणि प्रयोगाचे अधिष्ठान आहे. योग चमत्कार नसून ती वैज्ञानिकप्रक्रिया आहे. मानवी जीवन परिपुर्ण करणारे, सर्व बाबींचा समतोल विकास साधण्यास मदत करणारे व जीवनाच्या समस्यांची उकल करणारे शास्त्र होय. योग हे एका धर्माचे, भाषेचे किंवा पंथाचे केवळ तत्वज्ञान नाही तर जीवनाचा परिपूर्ण परिचय करुन देणारे शास्त्र होय.

मानवी आरोग्यात व्यक्तीच्या शारिरिक मानसिक व सामाजिक सुस्थितीला महत्व असते. तर योगात शरिर, मन, इंद्रिये आणि आत्मा यांच्या संतुलनाला महत्व असते. योग साधनेचे अंतिम ध्येय समाधी असून समाधी अवस्था प्राप्त करण्यासाठी शारिरिक, मानसिक संतुलन आवश्यक आहे. यालाच मनोकायिक संतुलन म्हणतात. मनोकायिक संतुलन म्हणजेच उत्तम आरोग्य होय.

२) प्राणायम -

प्राणायाम ही महत्वाची योग प्रक्रिया आहे. प्राणायामांचा संबंध श्वसनसंस्थेशी आहे. मनोकायिक संतुलनासाठी प्राणायाम प्रक्रिया अतिशय उपयुक्त ठरते. प्राणायामाचा अर्थ प्राणाचे व्यायाम असा आहे. प्राणाचे नियंत्रण म्हणजे प्राणायाम होय. प्राण+आयाम =प्राणायाम. आपल्या श्वासाचे पुरक (श्वास घेणे) रेचक (श्वास सोडणे) व कुंभक (श्वास स्थिर ठेवणे ) या मार्गावरील जाणिवपूर्वक नियंत्रण म्हणजे प्राणायाम होय.

प्राणायामाचे महत्व-

प्राणायामाचे आरोग्याच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले दिसून येते. योग्य पध्दतीने प्राणायाम केल्यास शरिरातील सर्व रोगांचा नाश होतो. तर अयोग्य पध्दतीने प्राणायाम केल्यास अनेक रोग उद्‌भवतात. नियमित आणि योग्य पध्दतीने प्राणायाम केल्यास शरिरातील विविध तक्रारी दूर होतात.

१) शरीराला कंप सुटणे, अवयवांना मुंग्या येणे, निद्रानाश, चिडचिड या तक्रारी कमी होतात.

२) पित्तदोष, गॅस, बध्दकोष्ठता नष्ट होते.

३) उच्च रक्तदाब, कमी रक्तदाब, ह्रदयरोगाच्या तक्रारी कमी होतात.

३) मानसिक ताणतणाव-

मानव फार पुर्वीपासूनच मानसिक ताणतणावाखाली जगताना दिसतो. आधुनिक काळात मानवी जीवन प्रचंड धावपळीचे, दगदगीचे आणि स्पर्धात्मक बनले आहे. जीवनातील अधिकची स्पर्धा, वाढती बेकारी, महागाई, समाजातील गुंडगीरी, भ्रष्टाचार, जीवनमुल्यांचा -हास, कौटुंबीक संस्काराचा अभाव, वाढती व्यसनाधीनता, कुटुंबातील व्यक्तीचे आजारपण, अशा विविध घटनांमुळे मानवाचे जीवन मानसिक ताणतणावाचे बनत चालले आहे. याशिवाय मानसाची भौतिकसुख संपत्तीची हाव, वाढणा-या गरजा, आपआपसातील हेवेदावे, द्वेष, मत्सर, कलह आणि स्पर्धा इ.मुळे ही मानसिक तणाव निर्माण होताना दिसतो.

शारिरिक आणि मानसिक संतुलनात बाधा आणणा-या व सामाजिक समायोजनाची क्षमता वाढविणा-या घटनांना व्यक्ती ज्या पध्दतीने प्रतिसाद देते, त्याला मानसिक तणाव असे म्हणतात. मानवाचे जीवन सुखी आणि समाधानी होण्यासाठी मानसिक ताण-तणावाचे व्यवस्थीत निराकरण होणे आवश्यक आहे. यासाठी त्यांच्यात आवश्यकतेनुसारे माघार घेणे, तडजोड करणे, जीवनमानात बदल करणे, सहनशिलता अंगी येणे, समस्या निराकरणाचे विविध कौशल्य संपादन करणे, सामाजिक पाठिंबा मिळविणे, इ.जीवनात स्विकार करणे अत्यावश्यक ठरते. यामुळे मानसिक ताण-तणावाचे निराकरण होण्यास मदत होते.

समारोप-

आधुनिक काळात वावरणा-या लोकांनी आपल्या जुन्या आणि पारंपरिक जीवनशैली बदलणे आवश्यक आहे. आधुनिक शिक्षणातून मानवाला नव-नवीन जीवनशैलीचे ज्ञान देणे गरजेचे आहे. आधुनिक काळातील विविध आव्हाने पेलण्याचे बळ शिक्षणातून मिळाले पाहिजे. त्याशिवाय शिक्षणातून समाजाच्या बदलत्या गरजा भागू शकणार नाहीत. शिक्षण हे खऱ्या अर्थाने समाजसुधारणेचे, सामाजिक परिवर्तनाचे प्रभावीसाधन बनविण्यासाठी शिक्षणात आधुनिक विचारप्रवाह विकसित झाले पाहिजेत. त्यादृष्टीने पर्यावरण शिक्षण, लोकसंख्या शिक्षण आणि आरोग्य शिक्षण या नव्या विचारप्रवाहांचे शिक्षणातील महत्व अनन्यसाधारण आहे. यातूनच मानवाच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करता येऊ शकणार आहे.

आजच्या मानवी जीवनात अधिक गतिमानता आलेली आहे. अशा गतिमान मानवाच्या गरजा भागविण्याचे सामर्थ्य शिक्षणात असावे लागते, तरच शिक्षण समाजाभिमुख होते. आजच्या शिक्षणात गरजेनुसार नविन विचारप्रवाह येत आहेत. त्यामुळे पारंपारिक शिक्षणाचा विचार करित राहिल्यास कालबाह्य होण्याचा धोका निर्माण होतो, म्हणून पारंपारिक आणि कालबाह्य शिक्षणाचे स्वरुप बदलण्याची गरज निर्माण झाली आहे. समाजात निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण होण्यासाठी आधुनिक शिक्षणात नविन विचार प्रवाह स्विकारणे क्रमप्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

अ.क्र. लेखकाचे नाव ग्रंथाचे नाव प्रकाशनाचे नाव इ.स.

१) डॉ.सुरेश करंदीकर - मुल्यशिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर- फेब्रुवारी १९९८

२) डॉ.विना मोहाडीकर- लैंगिक जीवन, परिमल प्रकाशन, औरंगाबाद-१९८४

३) डॉ.मुंडे धनंजय जी -योग्य आणि अयोग्य, जी.जे.जी.योग ॲकॅडमी-कोल्हापूर-१९८९

४) पवार बा.ग.,- युगपुरुष-म.ज्योतिबा फुले,-मातृभूमी प्रकाशन, पुणे नोव्हेंबर-१९९१

५) प्राचार्य भगत रा.तु.-शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन,कोल्हापूर, जून२००६

६) प्राचार्य डॉ.प्रभाकर चौधरी-मुल्यशिक्षण ते विद्यापिठस्तर,शिक्षण संमेलन-फेब्रु.२००४

❑❑❑